## सुमती पत्राच्या वर्गणीदारास एक सवलत.

## प्रतिभा.

वरील नांवाची कादंबरी श्रीयुत बाबू अवीनाशचंद्रदास एम० ए० बी० एल० यांची वंग साहित्यांत अत्यंत श्रेष्ठ पद पावलेल्या 'कुमारी' नामक कादंबरीचा अनुवाद आहे, एवढें सांगितलें असतां ही कादंबरी किती मनोहर आहे हें निराळें सांगण्याची काहीं आवश्यकता नाहीं. प्रस्तुत कादंबरी सुमती पत्राचे एप्रील अखेर वर्गणीदार होणारास मिया (४१०) किंमतीत दे ण्याचें येजिलें आहे. प्रती बेताच्याच काढावयाच्या असल्यामुळें या सवलतीचा फायदा घेऊं इच्छिणारांनीं खालील पत्त्यावर नांवें नोंदविण्याची त्वरा करावी. इतरांस एप्रील अखेरपर्यंत नांव नोंदविण्यास ट० ख० सह १०४ सवा रुपया.

सुमती हें पत्र दर सोमवारीं प्रसिद्ध होत असून यांत निवडक लेख, वर्तमान-सार, मनोरंजक आणि आश्चर्य कारक गोष्टी येत असून चालू सालच्या जानेवारी महिन्या पासून 'अंजनासुंदरी' नांवाची एक चटकदार कादंबरी चालू आहे. वार्षीक वर्गणी ट० हा० सह २ रु० तरी 'एक पंथ दो काज' या म्हणी प्रमाणें या पत्रास वर्गणीदार होऊन वरील सवलतीचा फायदा घेण्याची वाचकानीं कृपा करावी.

म्यानेजर-सुमती वर्धा. (सी. पी.)

नो. नं. १६

## नोटीस

बनाई मर्द विठोबा इंगळे कुणबी रा. मौजे वादलापूर तालुके आकोला इजला खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे भौरद तालुके आकोले येथील शेत स० नंबर २९ २।४९ आकार रुपये ३४ सालीम हे तुझे ताब्यांत आहे. सदरहु शेत वडिलो पार्जित असून तूं जिवंत आहेस तोंपर्यंत तुला ते खाण्याचा अधिकार आहे. आज-वर तुला लोकांचें कर्ज काढण्याची जरूर नव्हती व पुढें मुळींच कारणही नाहीं. तूं आपले भाच्याचें घरीं राहात आहेस व तूं ... स्थितींत तूं आपले भाच्याचे नांवानें आशा शेत खरेदी अगर बक्षिस करून सदरहु ... आहेस. तूं विधवा असल्यामुळें देणार ... सें मुलींच कारितां येत नाहीं व तुला ... कोणताही व्यवहार तुझी केल्यास तो तसा ... रद्द आहे करितां तुम्हास या कायद्या... नें कळवितों कीं तुझी जिवंत नोटिशी... तोपर्यंत सदरहु शेत तुझी खावे आहां ... मरणानंतर मी सदरहु शेताचा मा-तुमचे ... लक ... होणार आहे कळावें ता. २८-४-१३ द० ... कर नारायण काळे आकोला

सही

चंद्रभान वा० दर्याजी इंगळे कुणबी १० ९- आकोला नि० बु०

## जाहिरात

सर्व लोकांस जाहीर करण्यांत येते कीं श्रीसमर्थ गजानन महाराज संस्थान शेगांव यांचे समाधीचें (मंदिराचें) काम बांधण्याचे सुरू आहे याला लागणारा खर्च फार असून तो लोकाश्रयावर अवलंबून आहे. वर्गणीचें कामीं संस्थानाकडून हरी कुकाजी आणि बंकटलाल भवानीदास व गोपाळ मारुती लउळ व रावजी नारायण महाजन यांस वसूल करतें नेमिले गेले आहे. कांहीं लोक हरदास संन्यासी वगैरे हे या मठाचें कामासाठीं वर्गणी वसूल करतात म्हणून समजतें त्यांस वर्गणी न देतां या वरील ४ इसमासच वर्गणी देत जावी चार इसमाबद्दल ज्यास संशय येईल त्यांनीं वर्गणी शेगांवकर भिकाजी खंडुजी पाटील यांचे दुकानी मनीआर्डरीनें पाठवावी.

व्यवस्थापक

रामचंद्र कृष्णाजी पाटील

नो० नं० १८

## नोटीस

नोटीस बेशमी देवचंदलाल मोतीलाल व बीजीबाई नवरे गोविंदलाल जात खत्री राहणार मौजे पारस ता० बाळापूर जि० आकोला यांना—

खालीं सही करणार याजकडुन नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही उभतांचा मयत भाऊ नामें बळीराम याची मुलगी नामें देवकीबाई ही मुलगी माझा पुतण्या नामें शंकरलाल याचेशी लग्न लाऊन देण्याचे कबूल करून खर्चाचे सोयीसाठीं म्हणून आगाऊ नगदी रुपये मजपासून ३०० अक्षरी तीनशे उसनें घेतले. व तुमचा धाकटा भाऊ नामें बालमुकुंद यांची मुलगी चिखली येथील दिपचंद याचे मुलास देण्यास कबूल करून त्यांचे पासून रुपये दोनशे खर्चासाठीं म्हणून उसनें घेतले. हे दोन्ही प्रकार आकोले मुक्कामीं एकाच वेळीं होऊन लग्नाचा निश्चय तुम्ही आम्हास फाल्गुन व॥ ९ चा करून नंतर आम्ही तुमचे गांवीं येऊन आपल्या जातीच्या चालीरीती प्रमाणें सगाई "सोयरीक" करून दोन्ही मुलीला कुंकू लाऊन कपडे व सोन्या चांदीचे डागीनें अजमास रुपये ३९० चे किंमतीचे घातले व गाजेवाजे होऊन पानसुपारी वगैरे वाटली गेली. व त्या प्रमाणें लग्नाची सर्व सामुग्री तयार केली तुम्ही ऐन वेळेवर लग्नाचा वरील निश्चय मोडण्याचे बेतांत आहां व असेंही कळतें कीं तुम्ही दुसरीकडे सोयरीक जमवीत आहां. यामुळें माझें बरेंच नुकसान होणार आहे. करितां या नोटीशीनें कळ वितों कीं ही नोटीस पावल्या पासून आठ ८ दिवसांचें आंत दुसरी दोन्ही लग्नाची तीथी ठरवून सुमंगळ कार्य करून मोकळे व्हावे. तसें न केल्यास माझे एकंदर झालेले नुकसानी बद्दल व तुम्ही कबूल केलेल्या मुलीशीं लग्न लाऊन देण्याबद्दल रीतीप्रमाणें तजवीज कायद्यानें करीन आणि जातीच्या संबंधानें तुमच्या गैर वर्तनानें आम्हाला जो हलकेपणा येईल व बेअब्रु होईल त्या बद्दल तुम्हावर दिवाणी व फौजदारी करण्यांत येईल कळावें. ता० ३०-४-१३

सही

रामलाल नेमिचंद खत्री छोटे राममंदिर आकोला.

नो० नं० १९

## कापूस– तक्ता– साप्ताहिक– २६ एप्रिल १९१३ पर्यंत

| जिल्हा. | वर्ष | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या — ता. २६।४।१३ पर्यंतचा आठवडा | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या — ११।०।१२ पासून | काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या — ता. २६।४।१३ पर्यंतचा आठवडा | काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या — ११।०।१२ पासून | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठ्ठी — ता० २६।४।१३ पर्यंतचा आठवडा | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठ्ठी — ता. ११।०।१२ पासून आज तागाईत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उमरावती | चालूं साल | ३,६९१ | १९२६७५ | १०२१ | १८,६९६ | ४,८३८ | १४९,९३७ |
| | गुदस्त | २,४८९ | २४१,०८९ | ८९९ | २९३१३ | .... | .... |
| | तिगस्त | ३,४९१ | ५००४३६ | ९६४ | ११०८६ | .... | .... |
| यवतमाळ | चालूं साल | ३१३ | १३२९३४ | १०९६ | १७८१९ | १९६१ | ८१,४११ |
| | गुदस्त | १११ | १४१३२१ | १२९ | ११,२०४ | .... | .... |
| | तिगस्त | ७९ | ४०,०४३ | १९१ | १२,९०७ | .... | .... |
| आकोला | चालूं साल | २,८७९ | १७०,९८४ | २,१६० | ४१६६० | ९,६०९ | १६४,७६२ |
| | गुदस्त | १,९०७ | १८००७९ | १२१२ | ४७४८६ | .... | .... |
| | तिगस्त | २,४९० | ९९,४८८ | ९९० | २१०४९ | .... | .... |
| बुलढाणा | चालुं साल | १८१३ | ९२,७१४ | ७७७ | ९,७९७ | ३,२०० | ११३,८२८ |
| | गदस्त | ३२७ | १२०९०३ | २११ | ८,६६४ | .... | .... |
| | तिगस्त | १,९१३ | ११४७३२ | ४२४ | ९,८४९ | .... | .... |
| एकूण वऱ्हाड | चालू साल | ८,६९२ | ५२७५०७ | ५,०९४ | ८७,९७२ | १९,२०८ | ५०९,९३९ |
| | गुदस्त | ४,४३४ | ६८२९९२ | २,४०३ | ९२६६७ | .... | .... |
| | तिगस्त | ७,५२९ | ३५०६९९ | २,१२९ | ५०,८८७ | .... | .... |

टीप—चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे २७ एप्रिल १९१२ व २९ एप्रिल १९११ पावेतों होते

पत्रकें धाडणारे
मार्केट प्रेस
३० ८३

सी. यू. वील्स.
डायरेक्टर आफ आग्रिकल्चर
इंडस्ट्रीज—मध्यप्रांत

## नोटीस

नोटीस बेशमी जगु वा। भगवनजी जात कोळी राहणार मौजे भुरसरामागड ता० दर्यापूर जि० उमरावती यांस—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असोन लग्न होण्यास अंदाज १०।१५ वर्षे झाली व वयांत येण्यास ७ वर्षे झाली तेव्हां पासून तूं मला तीनचारवेळां नेले व आणले मला तुझे घरीं संसार संबंधीं कांहींच सुख प्राप्त झालें नाहीं तुह्मी मला मारठोक करून हाकून लाविले त्या वेळ पासून मी आपले आईबापाचे घरीं साहा वर्षांपासून असन लोकांचें कर्ज काढून निर्वाह करित आहे त्या मुळें मला लोकांचें कर्ज रुपये ३०० झालें आहे मी तुह्मास वरचेवर निरोप पाठविले तरी तुह्मी कांहीं माझी सोय करीत नाहीं तर या नोटीसीनें कळविलें जाते कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मजकडेस झालेलें लोकांचें कर्ज रुपये ३०० तीनशे देऊन मला घेऊन जावे तसें न केल्यास मी तुमचेवर रुपयाबद्दल दावा करून रुपये भरून घेईन व नोटीस ही फारकती समजून गंधर्व करीन ही नोटीस दिली कळावे ता० १५-४-१९१३ इ०

सही

नि० पन्यान मर्द जगू कोळी इचा हातचा आंगठा असे

नो० नं० १८

## नोटीस

रा० रा० श्रीनारायण जीतमल मारवाडी दुकान तेल्हारे तर्फे रिसिव्हर देविराम कोंडाजी डिस्ट्रीक्ट नाझर आकोला यांस—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी तेल्हारे येथें ता० ९-४-१३ इसवी रोजीं सदरहु दुकानची जमीन लावण्या करितां आले होते त्या वेळीं मौजे इनापूर प्रगणे अडगांव तालुके आकोट जिल्हा आकोला येथील सेत सर्वे नंबर ३५ निशानी मळीचे सालीम शेत पंचा समक्ष आह्मी हरासांत दरसाल रुपये १७५ व शिवाय सरकारी सारा इतक्यास मागितली त्या प्रमाणें तुह्मी सदरहु शेताचा हरास आमचे नांवानीं तीन वार करून आमच्या हरास पट्टीवर सह्या घेतल्या नंतर आह्मी निघून गेलों कांहीं वेळांनीं मागावून शेताची लागवण ज्यास्त लागल्या मुळें तुह्मी सदरहु शेत तीन वार केल्या नंतर पुन्हा हरास करून रा० रा० शंकर मोरेश्वर हिंगवे राहणार तेल्हारे यांस रुपये २०५ व शिवाय सरकारी सारा इतक्यास लाविली एक वेळ तीनवार हरास केल्यावर पुन्हा हरास करून शेत दुसऱ्यास लाविलें हें आपलें करणें कायदेशीर नाहीं. व त्या मुळें आमचे नुकसान झाले जर सदरहु शेत आह्मी करण्याचें सोडले असते व त्या लागवणींत नुकसान आले असते तर जबाबदार तुह्मी आह्मास धरले असते आमचे पेक्षां ज्यास्त रक्कम वाढल्यामुळें तुह्मी आपले फायद्याकडे पाहून आमचें नुकसान दरसाल रुपये ३० तीस प्रमाणें केलें आहे करितां य नोटिसीनें तुह्मास मुद्दाम कळविण्यांत येते कीं तुह्मी दरसालचे रुपये ३० प्रमाणें पांच वर्षाचे रुपेय १५० ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांत द्यावे व नोटिसीचा सर्व खर्च द्यावा तसें न केल्यास तुमचेवर रिती प्रमाणें फिर्याद करून सर्व रुपये भरून घेतले जातील कोर्ट खर्चा सुद्धां कळावे ही नोटीस आज तारीख माहे एप्रील सन १९१३ इसवी दस्तुर खुद्द

सही

लक्ष्मण नरहर इंगळे तेल्हारे द० खु०

भिकमदास सालगराम तेल्हारे

नो० नं० २०	द० खु० मारवाडींत

## नोटीस

नोटीस बेशमी बिहारिलाल गुलाबचंद मारवाडी रा० हीवरखेड ता० आंकोट

यांस—

खाली सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही माझ्याशीं अजमास एक महिन्या पुर्वी पंधरा खंडी कापसाचा दर रुपय ८२ प्रमाणे सवदा केला. तो अद्याप पावेतों मोजून नेला नाहीं व रुपये ही दीले नाहीं. तर ही नोटीस पावल्या पासून आठ दीवसाचे आंत कापुस मोजुन नेऊन रुपये आम्हांस द्यावे असे न केल्यास आम्हीं चालू भावानें कापुस विकून टाकूं व आम्हांस कापसाबद्दल जें काहीं नुकसान येइल तें व कापुस विके पावेतों मकानाचें भाडें व नोटीसीचा खर्च असे सेव कोर्ट मार्फत भरुन घेतले जाईल. नोटीस ता० ५-५-१९१३. कळावे.

सही

नारायण वा। गुणाजी माळी

द० खु०

नो० नं० २१

## नोटीस

तुराबखा वा। भिकमखा व अबदुलखा उभयता राहणार पिंपळगांवराजा

यांस--

मी खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं सुमारे तीन हप्ते झाले मौजे रोहण ता० खामगांव येथील शेत सर्वे नंबर २५ १७३=१९० चे रकम रुपये ३००० हजारास तुह्मास विकत दिलें असून त्या बद्दलचें खरेदीखत खामगांव सबराजिष्टर साहेबांचे कचेरींत नोंदलें गेले सदरहु शेताचा सर्वे नंबर खरेदखितांत चुकीनें २४ लिहीला गेला तरी तुह्मी सर्वे नंबर २४ चा नकरितां सर्वे नंबर २५- १७३- १९० सदरहु नंबरा बद्दल खरिदिखत करून देण्यास मी तयार आहे. व तुमचे कडेस खरेदीखतांत लिहिलेल्या रकमेपैकीं रुपये १००० एक हजार अद्याप येणें आहेत. ते तुह्मी ही नोटीस पावल्या पासून ४ चार दिवसाचे आंत आणून द्यावें. त्या प्रमाणें नकेल्यास तुमचेवर रिती प्रमाणें दावा करून कोर्ट खर्च व नोटिसीच्या खर्चासुद्धां रकम भरून घेऊ रकम न दिल्यास तुह्मी शेताचा ताबा करूं नये. कळावे ता० ५-५-१३ इ०

सही

महादु वा। अर्जुन रा० रोहण हातची नि० असे

नो० नं० १९

## कापूस– तक्ता– साप्ताहिक- ३ मे १९१३ पर्यंत

| जिल्हा. | वर्ष | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या — ता. ३।५।१३ पर्यंतचा आठवडा | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या — १।१०।१२ पासून | काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या — ता. ३।५।१३ पर्यंतचा आठवडा | काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या — १।१०।१२ पासून | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठडी. — ता० ३।५।१३ पर्यंतचा आठवडा | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठडी. — ता. १।१०।१२ आज तागाईत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उमरावती | चालूं साल | २,९३८ | १९५७७१ | ८०६ | १९,५०४ | ५,०१८ | १९९,९० |
| | गुदस्त | १,४९१ | २४२७०३ | ५०० | २९८१३ | .... | .... |
| | तिगस्त | २,८९९ | २०३३८१ | ३०९ | ११३९९ | .... | .... |
| यवतमाळ | चालूं साल | १३८ | १३३११० | ९९८ | १८,७७७ | ७८२ | ८२,४३ |
| | गुदस्त | ८८ | १४१४१४ | १९५ | ११.३९९ | .... | .... |
| | तिगस्त | ११९ | ४०,१६२ | ३१९ | १३,१२६ | .... | .... |
| आकोला | चालूं साल | २,२३७ | १९१४२१ | १,९८७ | ४३२४९ | २,९७० | १६७,७३ |
| | गुदस्त | ७१२ | १८०७९१ | ९७७ | ४८४१३ | .... | .... |
| | तिगस्त | १,८८८ | ९७,३७६ | ८७५ | २१९२१ | .... | .... |
| बुलढाणा | चालुं साल | ११२० | ९३,८३४ | ३०६ | १०,१०३ | २,३५० | १२१,९ |
| | गुदस्त | १६५ | १२०६६८ | २७५ | ८,९३९ | .... | .... |
| | तिगस्त | ९६८ | ११५७०० | १७८ | ६,०२७ | .... | .... |
| एकूण वऱ्हाड | चालू साल | ६,४३३ | ५३४१३६ | ३,६५७ | ९१,६३३ | ११,१२० | ५२७,६ |
| | गुदस्त | २,४५६ | ६८५५७६ | १,९४७ | ९४६१४ | .... | .... |
| | तिगस्त | ५,८७४ | ३५६६१९ | १,५८१ | ५२,४६९ | .... | .... |

टीप—चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे ४ मे १९१२ व ६ मे १९११ पावेतों

पत्रकें धाडणारे
मार्केट प्रेस
३० ७७

सी. यू. वील्स.
डायरेक्टर आफ आग्रिकल्चर
इंडस्ट्रीज—मध्यप्रांत

## नोटीस

नोटीस बेशमी खैरातखां वलद मेताबखां उमरावी मर्द मेताबखां, शेखजिवन वलद महमदहुसेन यांस

खाली सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आपले मौजे हात यथील शेत आह्मांस देण्याचा ठराव केला व आह्मा पासून ईसारही घेतला आहे. परतु आपण आपली रकम घेऊन आह्मांस खरीदीखत करून दिलें नाहीं. व आतां आह्मी आपली रकम देण्यास तयार असतां लोकांच्या सांगण्यावरून तुह्मी आह्मासी झालेला ठराव रद्द करण्याचें मनांत आणिलें आहे. तरी आह्मी आपली रकम देण्यास तयार आहों तेव्हां आपण आपली रकम घेऊन आह्मास खरीदीखत व शेताचा ताबा घ्यावा. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचें आंत ही गोष्ट करावी. तसें न केल्यास ह्मणजे आपण आपले पैसे घेतले नाहीं व आह्मास खरेदीखत करून शेताचा ताबा दिला नाहीं तर योग्य कोर्टांत दावा करावा लागेल व आपणास कोर्टखर्च व या नोटीसीचा खर्च भरून द्यावा लागेल. कळावें-

सही

महमदईसब वलद महमदहुसेन रा० हात तालुके बाळापुर

नो. नं. २२

## नोटीस

नोटीस बेशमी हुसेनखां वलद वजिरखां मुसलमान राहणार वाकद तालुका वासीम यांस

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुमच्याशी माझें ७ वर्षे झाले नोहोतीर झाले. तुमच्या पोटची मला एक मुलगी झाली ती तुह्मी मजजवळून हिसकून घेतली. व तीन वर्षां पासून मजला सोडून दिले सबब तुमचा मजवरचा नवरेपणाचा हक्क उडाला मी खानदानी असल्यामुळें इतके दिवस वाट पाहत राहली. व तुह्मी आपले लग्नाचे बायकों बरोबर संसार करीत अहा. फक्त माझ्यावर आतां सावकारी रकम रुपये२०० कर्ज झाले आहे. (खाण्याबदल) तें देऊन नोटीस पावल्या पासून १९ दिवसाचे आत मजला घेऊन जावें. मी नांदण्यास तयार आहे. मुदतीच्या आंत मला घेऊन जावे. असे केल्यास मी बायको तुमची नसतां मी दुसऱ्या मनुष्या बरोबर मोहोतीर लावीन मग तुमचा माझा नवरेपणाचा कोणतेच प्रकारचा हक्क राहणार नाहीं. बलक माझा माहेरचा हक्क तुमच्यावर राहीला आहे तो दावा करून घेईन मती वैशाख शु॥ ४ सन १३२२ फसली

सही

जेबन जवजे हुसेनखां ईचाआंगठा असे हल्लीं मुक्काम जयपूर पो. इंगोली इलाखा मोगलाई.

नो० नं० २३

## नोटीस

रा० रा० लक्ष्मणदास भगवानदास साहु दुकान जळगांव यांस—

या जाहीर नोटीसीनें कळविण्यांत येते कीं मी तुमची विधवा सून आहे. माझा भ्रतार मरण पावल्या नंतर तुह्मी नाना प्रकारचे छळ केले व मला तीर्थयात्रेच्या निमित्तानें काशीक्षेत्रीं दोघी सासवा सुद्धां ठेविलें आतां मी मालकीण असून तुह्मी अन्नवस्त्र ही देऊं इच्छित नाहीं व मजवर फौजदारी करण्याची धमकी देत आहां. तुह्मी फर गडबड कराल तर मी सर्व गोष्टींचा परिस्फोट कचेरींत करीन. मी लाचारीमुळें कर्ज ३०० रुपये व्याजानें काढून दुकान दारी चालवून निर्वाह कसातरी करिते. ही नोटीस पोंहोंचल्या तारखे पासून आठ ८ दिवसांचे आंत माझी योग्य तरतूद करावी. आणि कर्ज चुकतें करावें. तसें करण्यास चुकाल तर तुह्मावर फौजदारी व दिवाणी करून योग्य ती दाद मिळवून घेईन. कळावे ता० १८-४-१३ ई० सही

हिरा मर्द तुळशिराम द० खु०

नो० नं० २४

## नोटीस

नोटीस बेशमी शेख आलम वलद प्यार महमद यांस—

खाली सही करणार शेख अब्रु वलद शेख आलम याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमची बुद्धी ठिकाणावर नसल्यामुळें तुह्मी वेडे झाला आहात तेव्हां आपण आपल्या जिनगीची अफरातफरा करूनये कारण आपल्या जिनगीचा मी वारस असल्यामुळें व तुमचे डोके फिरल्यामुळें तुह्माला आपली जिनगी अफरा तफरा करता येत नाहीं. तरी या नोटीसीनें आपणांस कळविण्यांत येते कीं तुह्मी वर सांगीतल्या प्रमाणें अफरा तफरा करूनये. ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचें आंत आपण आपल्या जिनगीची अफरा तफरा न करण्या विषयीं कबूल करावे नाहीं तर मला योग्य कोर्टांत दाद मागावी लागेल सही

शेख अब्रु वलद शेख आलम राहाणार हात तालुका बाळापुर निशाणी अंगठा

नो० नं० २५ असें

## नोटीस

या नोटीसीनें सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं माझा बाप शेखआलम वलद प्यार महमद ह्याला बुद्धी भ्रंश झाला आहे तरी या नोटीसीनें जाहीर करण्यांत येते कीं त्यानीं आपल्या जिनगीची अफरा तफर केल्यास ती कायद्यानें रद्द आहे. कारण मी त्याचे जिनगीचा वारस असल्यामुळें व त्याचे डोके फिरल्यामुळें त्याला आपल्या जिनगीची अफरातफर करिता येत नाहीं व त्यानें मला नजुमानतां कांहीं अफरातफर केल्यास किंवा कांहीं माल विकत देण्याचा ठराव केल्यास मी त्याचा जबाबदार नाहीं. व त्या मालाचा कबज ही देणार नाहीं. कळावें

सही

शेख अब्रु वलद शेख आलम रा० हात ता० बाळापूर याचा निशानी आंगठा असे

नो० नं० २६

## कापूस-तक्ता-साप्ताहिक- १० मे १९१३ पर्यंत

| जिल्हा. | वर्ष | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या: ता.१०।५।१३ पर्यंतचा आठवडा | कापसाच्या गाड्यांची संख्या: १।१०।१२ पासून | रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या: ता. १०।५।१३ पर्यंतचा आठवडा | रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या: १।१०।१२ पासून | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठ्ठी: ता० १ ।५।१३ पर्यंतचा आठवडा | बांधलेली गठ्ठी: ता. १।१०।१२ पासून आज तागाईत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उमरावती | चालूं साल | २,४३७ | १९८७४३ | ७२३ | २०,२२७ | ४,४६७ | १६०,६८१ |
| | गुदस्त | १,१९९ | २४३९७३ | ९४७ | २६३६७ | .... | .... |
| | तिगस्त | २,६७२ | १०६११३ | ९०८ | ११९०४ | .... | .... |
| यवतमाळ | चालूं साल | ९४ | १३३१६९ | ६९० | १९,४८२ | ६१ | ८३,१३० |
| | गुदस्त | ९६ | १४१४८२ | २०३ | ११,६०२ | .... | .... |
| | तिगस्त | १०७ | ४०,२६९ | १६० | १३,२८६ | .... | .... |
| आकोला | चालूं साल | १,३३१ | १९२७९२ | १,११३ | ४४३६२ | ३,२०८ | १७१,६३९ |
| | गुदस्त | ७४३ | १८१२३४ | ९७७ | ४९०४१ | .... | .... |
| | तिगस्त | १,२४८ | ९८,६२४ | ६२४ | २२९४७ | .... | .... |
| बुलढाणा | चालूं साल | ६२६ | ९४,४६० | ३४८ | १०,२९१ | २,८०१ | १२४,२९४ |
| | गुदस्त | ११० | १२०७७८ | ७१ | ९,०१० | .... | .... |
| | तिगस्त | ९०८ | ११६६०८ | २९२ | ६,३१९ | .... | .... |
| एकूण वऱ्हाड | चालू साल | ४,४४८ | ५३९१२० | २,६७४ | ९४,३२२ | १०,५३७ | ५३९,८४० |
| | गुदस्त | १,७६४ | ६८७४६७ | १,३९८ | ९६०२० | .... | .... |
| | तिगस्त | ४,९३५ | ३६१६१४ | १,९८४ | ५४,०५६ | .... | .... |

टीप—चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे ११ मे १९१२ व १३ मे १९११ पावेतों होते

पत्रकें धाडणारे मार्केट प्रेस २९ ७१

सी. यू. वील्स.
डायरेक्टर आफ आग्रिकलचर इंडस्ट्रीज—मध्यप्रांत

## जाहिर नोटीस

मी खालीं सही करणार याज कडून सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येते कीं, आह्मी पातूरचे रस्त्यानें जात असतांना समोर नऊ मैलावर आह्मांस आमच्या जवळ जे कांहीं कागदपत्र होते ते कोठें तरी गळून पडल्याचें दिसून आलें. ते कागद महत्वाचे असल्यामुळें जाहिर करण्यांत येते कीं ते कागद ज्या कोणास सापडतील त्यानें आह्मास परत केल्यास त्यास १५ रुपये इनाम देण्यांत येईल त्या कागदांत खरेदीखत नोंदलेलें व बिन नोंदलेलें पट्टेखत नोंदलेलें व बिन नोंदिललें या शिवाय दोन वह्या खाते नांवचें असलेलें व कांहीं चिल्हर कागद हरवले आहेत. आमचे कागद ज्या वेळेस हरवल्याचे आह्मास आढळून आलें त्याच वेळेस आह्मीं रस्त्यांनें पडले असतील ह्मणून परत आकोल्यास आलों परंतु आह्मास आमचे कागद सांपडले नाहींत. सबब या नोटिसीनें सर्वांस जाहीर केलें आहे. व ज्या कोणास सांपडतील त्यास वर लिहिल्या प्रमाणें इनाम दिला जाईल. कळावें ता० १६-५-१३ सही

सखाराम सूर्यभान पाटील भांगे
मंडार बु॥ हल्लीं राहणार
खामखेडा प्रगणे पातूर
ता० बाळापूर द० खु०

नो०नं० १८

---

## नोटीस

नोटीस बेशमी महादू वा बाबूरया धनगर राहणार कानसनी ता० आकोले यांस:—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं तुमचे जवळ मी पातुरनंदापूर शेत सर्वे नंबर २१० हें शेत तुह्मास लहानगहाण करून दिलें होतें. सदरहू रुपयाचा भरणा तुह्मी फक्त श्रावण मोन्याचें गहाणाचें ११८ रुपये दिले. बाकीचे १८२ रुपयांचा भरणा मुळीच पावला नाहीं. त्या रुपयाबद्दल तुह्मी मला कागद करून देणार होते. तो कागद माजवळ हल्लीं आहे. तुह्मी माझे पुतणे आहांत ह्मणून मी आतांपर्यंत उगा बसलों तरी तुह्मास कळविण्यांत येते कीं तुह्मी जितके मोन्याचे रुपये चुकते केले तितके रुपये मजपासून व्याजासुद्धां घेऊन लहानगहाणाचा हक्क सोडून द्यावा. मोन्याचे रुपया खेरीज मी कोणतेच प्रकारें जबाबदार नाहीं. सदरहु रक्कम सदाशीव निंबाजी पटवारी बोरगांव खुर्द याज पासून रुपये घेऊन पावती व गहाणाचा कागद त्यांचे स्वाधीन करून देणें. ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत येऊन रक्कम घेऊन जावी. असें नकेल्यास नोटीस पावल्या पासून रुपयाचें व्याज मिळणार नाहीं. ता० १७-४-१३ इसवी दस्तुर कृष्णा रावोजी द० खु० सही

बिठू वा॥ लक्ष्मण धनगर बोरगांव
खुर्द निशानी खुद्द हाताचा
आंगठा असे

नो० नं० १९

---

## नोटीस

नोटीस बेशमी तुळशी मर्द गणू राठोड राहणार नांदुरा बु॥ ता. मलकापूर इंस:—

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी सवत असून आपला नवरा मैत झाल्यावर इस्टेटी पैकीं २००० सुमारें दोन हजाराची इस्टेट तूं आपले २ मुलीला दिली त्या २ मुली पहिले घरच्या आहेत व १ या घरची आहे. मला एक मुलगा आहे. त्यामुळे तो पूर्ण वारस असून तुझ्या पूर्व घरच्या मुलींचा हक्क कांहीं नव्हता शिवाय तुं लोकांचे कर्ज सुमारें ९७ रुपये करून त्याचा हुकुम झाला तेव्हां ते रुपये मी भरले कांहीं शेती तुझी मुलीच्या फारकतींत व सोयऱ्यांचे खर्चांत वृथा गमाविलेली आहे. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं कसबे नांदुरा येथील दोन शेते व दोन घरें ज्या शेताबद्दल तुह्मी दहावर्षाच्या पट्यानें तें दिलें सबब तुह्मास २४ रुपये दंड झाला आहे. या वरील इस्टेटींत तुह्मी बीलकुल अफरातफर करूंनये. अगर कोणास गहाण खरीदी बक्षीस अगर पट्यानें देऊंनये. दिल्यास त्या बद्दलची जबाबदारी तुमचे वर राहील कोणत्याच तऱ्हेनें इस्टेटीवर राहणार नाहीं. ही नोटीस दिली ता० १६ मे. १९१३ ई.

सहीची निशानी आंगठा
रावजी वा॥ गणू राठोड अ. पा.
क. आई सारजाबाई मर्द गणू
राठोड रा० नांदूरा हिचा—

नो० नं० २०

---

## नोटीस

नोटीस बेशमी लुगाई मर्द उदेभान कुणबी धोत्रे रा० पाटखेड तालुका आकोला यांसः—

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी सावत्र आई आहेस. माझे बाप मयत होण्यास सुमारें ६ वर्षे झाले. वडिलोपार्जित इस्टेट सुमारें ६००० रुपये किमतीची आहे जमीन घर वगैरे ती तूं लोकांचे सांगण्यावरून अफरातफर करणार आहेस असें कळतें. तरी नोटीस देतो कीं तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस. इस्टेटीस धोका आणण्याचा तुझा अधिकार नाहीं. यावरही तूं अफरातफरी केल्यास तें करणें रद्द समजलें जाईल. व तुझ्या अशा करण्यानें इस्टेट जबाबदार राहणार नाहीं. कळावें ता० १९ माहे मे १९१३ ई.

सही
मारोती उदेभान द० खु०

नो० नं० २१

---

## नोटीस

नोटीस बेशमी तुकाराम पुंनाजी कुणबी रा पिंपरी ता. अकोला यांसः-

खालीं सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुह्मास १ कुलमुखत्यारपत्र माझे वतीनें कोर्टात काम करण्यास नोंदून दिले होते परंतु आतां यापुढें कोर्टाचे काम नसल्यानें आजतारखेपासून ते रद्द केलें आहे. यापुढें माझे नावें कोणतेंच काम तुह्मी केल्यास मी जबाबदार नाहीं. तारीख१६ मे १९१३ ई.

सहीची निशानी आंगठा
भैराम टलु कुणबी रा. पिंपरी याचा

नो नं २२

---

## कापूस- तक्ता- साप्ताहिक- १७ मे १९१३ पर्यंत

| जिल्हा. | वर्ष | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या: ता. १७।५।१३ पर्यंतचा आठवडा | काटन मार्केट — आयात — कापसाच्या गाड्यांची संख्या: १।१०।१२ पासून | काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या: ता. १७।५।१३ पर्यंतचा आठवडा | काटन मार्केट — आयात — रुईच्या बोजाच्या गाड्यांची संख्या: १।१०।१२ पासून | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठ्ठी: ता० १७।५।१३ पर्यंतचा आठवडा | गठ्ठे बांधण्याचे प्रेस — बांधलेली गठ्ठी: ता. १।१०।१२ पासून आज तागाईत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उमरावती | चालू साल | २,८२२ | १६१९६९ | ९७२ | २१,२०० | ३,४९२ | १६४,३०९ |
| | गुदस्त | ७६७ | २४४७४० | ५१२ | २६८७९ | .... | . |
| | तिगस्त | १,७६० | १०७८७३ | ४१० | १२३१९ | .... | |
| यवतमाळ | चालू साल | २१ | १३३१८६ | ६४३ | २०,१२९ | ९९३ | ८४,२९० |
| | गुदस्त | २४ | १४१४९६ | २५९ | ११,८६१ | .... | .... |
| | तिगस्त | ४९ | ४०,३१८ | १३४ | १३,४२० | .... | .... |
| आकोला | चालू साल | १,६९५ | १९४४४७ | १,४४५ | ४५८०९ | [illegible] | [illegible] |
| | गुदस्त | ३७८ | १८१६१२ | १०९९ | ५०१४१ | .... | .... |
| | तिगस्त | १,२६४ | ९९,८८[illegible] | [illegible] | २३२८३ | .... | .... |
| बुल्ढाणा | चालू साल | ९९६ | ९९,४५६ | २७३ | १०,५२४ | २,१४७ | १२६,९४१ |
| | गुदस्त | ५१ | १२०८२९ | ५३ | ९,०६३ | .... | .... |
| | तिगस्त | ८६१ | ११७४६९ | ११३ | ६,४३२ | .... | .... |
| एकूण वऱ्हाड | चालू साल | ५,५३४ | ५४४६५४ | ३,३३३ | ९७,६९८ | १०,१४८ | ५५१,४५५ |
| | गुदस्त | १,२१० | ६८८६७७ | १,९२३ | ९७९४४ | .... | .... |
| | तिगस्त | ३,९३४ | ३६५५४८ | १,३९३ | ५५,५४० | .... | .... |

टीप—चालूं सालाच्या बरोबरीचे साल गुदस्त व तिगस्त सालचे आठवडे १८ मे १९१२ व २० मे १९११ पावेतों होते

पत्रकें धाडणारे
मार्केट प्रेस
२७ ५९

सी. यू. वील्स.
डायरेक्टर आफ आग्रिकल्चर
इंडस्ट्रीन—मध्यप्रांत

